(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

# मुंबई उच्च न्यायालयातील
# सर्वसाधारण मूळ दिवाणी अधिकारिता

## रिट याचिका क्र . १२३/ २०२२

वेदपाल सिंग यांचा पुत्र सचिन कुमार )
वय : ३२ वर्षे , व्यवसाय : आरपीएफ )
राहणार - खोली क्रमांक ३०७ , 'बी' विंग, )
देवसृष्टि, इमारत क्रमांक 2, )
नालासोपारा (पश्चिम) जिल्हा : पालघर, )
सध्याचा पत्ता भोकरहेरी गाव, )
पोस्ट भोकरहेरी , मुझफ्फरनगर जिल्हा (उत्तर प्रदेश) ) ..... याचिकाकर्ता

**विरुद्‌ध**

१. केंद्र सरकार )
मार्फत रेल्वे मंत्रालय )
कार्यालयीन पत्ता : खोली क्रमांक 239, )
रेल्वे भवन, रायसीना रोड, )
सीपी, नवी दिल्ली-110001 ११० ००१. )
२. उप महानिरीक्षक आणि मुख्य सुरक्षा आयुक्त, )
पश्चिम रेल्वे (आरपीएफ), )
कार्यालयीन पत्ता : चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०. )

३. वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त (आरपीएफ) )
पश्चिम रेल्वे/मुंबई सेंट्रल , )
कार्यालयीन पत्ता : मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ ) ....उत्तरवादी

याचिकाकर्त्यासाठी श्री. राहुल वालिया आणि श्रीमती अस्मिता पेंढारकर आणि अमित आर. तिवारी.

उत्तरवादी - केंद्र सरकारकरिता आर. आर. शेट्टी.

**न्यायमंच - एस. व्ही. गंगापूरवाला, एसीजे आणि**
**प्रभारी मुख्य न्यायमूर्ती आणि संदीप व्ही. मारणे न्या.**

**राखून ठेवल्याचा दिनांक : २३ फेब्रुवारी २०२३.**
**अधिघोषित केल्याचा दिनांक : १ मार्च २०२३.**

**न्यायनिर्णय (संदीप व्ही. मारणे यांच्या द्वारे)**

१. याचिकाकर्ता, रेल्वे संरक्षण दलातील (**आर पी एफ**), माजी शिपाई , हा दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजीच्या त्याला सेवेमधून काढून टाकण्याच्या आदेशाद्वारे व्यथित आहे. तसेच त्याचे अपील फेटाळण्याच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या आदेशाद्वारे सुद्धा तो व्यथित आहे.

२. याचिकाकर्त्याची दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजी आर पी एफ चा सदस्य म्हणून नोंदणी झाली आणि त्याची शिपाई पदावर नियुक्ती झाली. दिनांक १२

डिसेंबर २०१८ रोजी त्याला ग्रँट रोड रेल्वे स्थानकामध्ये ७.०० ते १५.०० या कालावधीमध्ये फलाटावरील कर्तव्यासाठी पाठविण्यात आले होते. दोन प्रवाशांना धमकी देऊन त्यांच्याकडून रुपये १२०००/- इतक्या रकमेच्या बेकायदेशीर लाचेची कथित मागणी करण्याबाबत आणि ती स्वीकारण्याबाबत त्याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. असा आरोप ठेवण्यात आला की, जेव्हा त्याने रुपये १२०००/- ही रक्कम प्रवाशांना परत दिली, तेव्हा सरकारी रेल्वे पोलीस ( जीआरपी) यांनी याचिकाकर्त्यास हजर राहण्यास फर्मावले आणि म्हणून जीआरपी ने त्याच्या गुन्ह्याची नोंद केली नाही.

३. असे दिसून येते की, वस्तुस्थिती शोधण्यासाठी चौकशी करण्यात आली आणि निरीक्षक, आर पी एफ, मुंबई सेंट्रल यांनी अहवाल सादर केला. सादर केलेल्या अशा अहवालाच्या आधारे वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त, आरपीएफ, मुंबई सेंट्रल यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी आदेश पारित केला, ज्याद्वारे याचिकाकर्त्याविरुद्ध चौकशी करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नव्हते असे निरीक्षण नोंदवून, त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले.याचिकाकर्त्याने दिनांक ५ फेब्रुवारी २०१९ रोजी महानिरीक्षक आणि मुख्य सुरक्षा आयुक्त यांच्याकडे अपील दाखल केले आणि ते दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या आदेशाद्वारे फेटाळण्यात आले. अपील प्रलंबित असताना त्याने गुजरात उच्च न्यायालय येथे विशेष दिवाणी अर्ज क्रमांक १९२५७/२००९ दाखल करून दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजीच्या शिक्षेच्या आदेशास आव्हान दिले. परंतु, नंतर योग्य अशा प्राधिकरणासमोर योग्य कारवाई करण्याच्या

स्वातंत्र्यासह, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ रोजी त्याने सदर अर्ज मागे घेतला.

४. अशाप्रकारे दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजीच्या शिक्षेच्या आदेशाला आणि दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अपिलीय प्राधिकाऱ्याच्या आदेशाला आव्हान देणारी प्रस्तुत याचिका याचिकाकर्त्याने दाखल केली आहे.

५. याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित विद्वान वकील श्री. वालिया यांनी असे सादर केले की याचिकाकर्त्यास सेवेतून बडतर्फ करण्यापूर्वी उत्तरवादींनी कोणतीही शिस्तभंगाची चौकशी केली नाही किंवा तसा प्रयत्न केला नाही आणि त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्त्वांचा सरळसरळ भंग करून त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. असे की, चौकशी करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला होता हे दर्शवणाऱ्या कोणत्याही अभिलेखाअभावी चौकशी करण्याच्या अव्यवहार्यतेबद्दलचा नोंदवलेला निष्कर्ष असमर्थनीय आहे.बडतर्फीच्या आदेशामध्ये नोंदविलेल्या निष्कर्षाकडे लक्ष वेधत श्री. वालिया यांनी असा युक्तिवाद केला की, चौकशी न करण्यासाठी नोंदविलेली कारणे ही तर्कावर आधारित आहेत.असे की, चौकशविना निष्कर्ष केवळ तर्क किंवा संयोगांच्या आधारे नोंदविता येऊ शकत नाही.त्यांच्या युक्तिवादाच्या पुष्ट्यर्थ श्री. वालिया यांनी खाली नमूद केलेल्या न्याय निर्णयांवर भिस्त ठेवली :

i) **रिसल सिंह विरुद्ध हरियाणा राज्य आणि इतर**, (२०१४) १३ एससीसी २४४;

ii) **जसवंत सिंह विरुद्ध पंजाब राज्य आणि इतर** (१९९१) १ एससीसी ३६२ ;

iii) **केंद्र सरकार आणि इतर विरुद्ध राम बहादूर यादव**, (२०२२) १ एससीसी ३८९ ;

iv) **पोलीस आयुक्त दिल्ली आणि इतर विरुद्ध जय भगवान**, (२०११) ६ एससीसी ३७६.

६. याउलट, उत्तरवादी यांच्यावतीने विद्वान वकील श्री. शेट्टी यांनी याचिकाकर्त्यास विरोध करून बडतर्फीच्या आदेशाचे समर्थन केले.त्यांनी असे सादर केले की, ज्या प्रवाशांचे याचिकाकर्त्याने संरक्षण करायला पाहिजे, त्या प्रवाशांकडून पैसे उकळण्याचे याचिकाकर्त्याचे गैरवर्तनाचे स्वरूप आणि त्यांच्याशी खाजगी स्वरूपाची तडजोड करण्याचे कृत्य यांचा विचार करता, सक्षम प्राधिकाऱ्यांनी चौकशी न करता त्याला सेवेतून बडतर्फ करणे संयुक्तिक आहे. असे की, गणवेशधारी कर्मचारी असलेल्या याचिकाकर्त्याचे वर्तन इतके असभ्य आहे की तो सेवेतून सरळ बडतर्फ होण्यास पात्र आहे. असे की, याचिकाकर्त्याने बेकायदेशीर लाचेची रक्कम प्रवाशांना परत करून त्यांच्याशी खाजगीरीत्या तडजोड केली आणि त्यांना त्याच्याविरुद्ध जबाब देण्यापासून रोखले.याचिकाकर्त्याने केलेल्या अशा तऱ्हेच्या खाजगी तडजोडीमुळे , प्रवासी त्याच्याविरुद्ध साक्ष देण्यासाठी पुढे आले नाहीत आणि म्हणून चौकशी योग्यरीत्या माफ केली गेली. दिनांक २० डिसेंबर २०१८ रोजी नोंदविण्यात आलेल्या याचिकाकर्त्याच्या जबाबाकडे त्यांनी आमचे लक्ष वेधले, ज्यात त्याने रुपये १२०००/- इतकी लाचेची रक्कम परत दिल्याचे कबूल केले होते. त्यांनी

असे म्हणणे मांडले की, अशा प्रकारे कबुली दिल्यानंतर सदर प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी करण्यामध्ये अन्यथा काहीही अर्थ नव्हता.

७. श्री. शेट्टी यांनी पुढे असे म्हणणे मांडले की जरी विभागीय चौकशी केली असती तरीही, प्रवाशांच्या साक्षीअभावी याचिकाकर्त्यास शिक्षा देता आली असती आणि त्या संदर्भात त्यांनी **हरियाणा सरकार विरुद्ध रत्तन सिंग** (१९७७) एससीसी ४९२ या प्रकरणामधील सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली. असे की, प्रवाशांची सरतपासणी करून केवळ चौकशी न करण्यामुळे अशा चौकशीमध्ये नोंदविता येऊ शकलेल्या अंतिम निष्कर्षामध्ये कोणताही बदल झाला नसता.आपल्या युक्तिवादाच्या पुष्ट्यर्थ श्री. शेट्टी यांनी **केंद्रीय विद्यालय संघटन आणि अन्य एक विरुद्ध एस. सी. शर्मा** (२००५) २ एससीसी ३६३ या प्रकरणातील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली.

८. पक्षकारांचे परस्पर विरोधी दावे आता आमच्या विचारार्थ आहेत.

९. सद्य प्रकरणात भारतीय संविधानाच्या खालील नमूद केलेल्या अनुच्छेद ३११ (२) आणि ३११ (३) च्या खंड ( ख) मध्ये दिलेल्या अधिकारांचा वापर करून याचिकाकर्त्यास सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

**३११. संघराज्य किंवा राज्य यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या नागरी पदांवर सेवा नियुक्त केलेल्या व्यक्तींना बडतर्फ करणे, पदावरून दूर करणे किंवा पदावनत करणे. -**

(१) जी व्यक्ती संघराज्याच्या नागरी सेवेची किंवा अखिल भारतीय सेवेची किंवा राज्याच्या नागरिक सेवेची सदस्य असेल, अथवा संघराज्य किंवा राज्य यांच्या नियंत्रणाखाली असलेले नागरी पद धारण करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्या प्राधिकाऱ्याने तिची नियुक्ती केली होती त्याहून दुय्यम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून बडतर्फ केले किंवा पदावरून दूर केले जाणार नाही.

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्या चौकशीमध्ये तिच्यावरील दोषारोपांची माहिती करून दिलेली आहे आणि त्या दोषारोपांबाबत तिला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिलेली आहे, अशी चौकशी झाल्याखेरीज तिला बडतर्फ केले जाणार नाही किंवा पदावरून दूर केले जाणार नाही किंवा पदावनत केले जाणार नाही. परंतु असे की, अशा चौकशी अंती तिच्यावर अशी कोणतीही शास्ती लादण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल त्याबाबतीत, अशा चौकशीमध्ये सादर केलेल्या पुराव्याच्या आधारावर अशी शास्ती लादता येईल आणि अशा व्यक्तीला प्रस्तावित शास्ती विरुद्ध अभिवेदन करण्यासाठी कोणतीही संधी देण्याची आवश्यकता असणार

नाही.

परंतु आणखी असे की, हा खंड पुढील बाबतीत लागू होणार नाही]. -

( क) एखादी व्यक्ती ज्या वर्तनामुळे फौजदारी दोषारोप सिद्ध झाल्यानंतर दोषी ठरलेली असेल त्या वर्तनाच्या कारणावरून तिला बडतर्फ किंवा पदावरून दूर करण्यात आले असेल किंवा पदावनत करण्यात आले असेल त्या बाबतीत; किंवा

( ख) एखाद्या व्यक्तीस बडतर्फ किंवा पदावरून दूर करण्याचा किंवा तिला पदावनत करण्याचा अधिकार असलेल्या प्राधिकाऱ्याला काही कारणास्तव - ते कारण त्या प्राधिकाऱ्याला नमूद करावे लागेल - अशी चौकशी करणे वाजवीपणे व्यवहार्य नाही असे खात्रीपूर्वक वाटेल त्या बाबतीत; किंवा

(ग) अशी चौकशी करणे राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने समयोचित नाही असे राष्ट्रपतीला, किंवा यथास्थिती, राज्यपालाला खात्रीपूर्वक वाटेल त्या बाबतीत.

(३) जर पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्ती बाबत खंड (२) मध्ये निदेशिलेली अशी चौकशी करणे वाजवीपणे व्यवहार्य आहे किंवा कसे असा प्रश्न उद्भवला तर, अशा व्यक्तीला बडतर्फ किंवा पदावरून दूर करण्याचा किंवा तिला पदावनत

करण्याचा अधिकार असलेल्या प्राधिकाऱ्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

१०. आरपीएफ नियमांमधील नियम १६१ मध्ये सुद्धा याच विषयीच्या तरतुदी आहेत, ज्या पुढील प्रमाणे आहेत :

**१६१. विशिष्ट प्रकरणांमध्ये विशेष पद्धत :**

या नियमांमध्ये इतर काहीही अंतर्भूत असले तरीही -

(i) नोंदणीकृत सदस्याच्या ज्या वर्तनामुळे त्याच्यावर फौजदारी गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात येऊन तो दोषी ठरला असेल आणि त्याला कोणतीही शिक्षा देय झाली असेल, किंवा

(ii) या नियमांमध्ये तरतूद केलेल्या पद्धतीनुसार चौकशी करणे वाजवी रीतीने व्यवहार्य ठरत नाही अशी शिस्तभंग विषयक प्राधिकरणाचे खात्री पटली असेल व त्याने त्याबाबतची कारणे लेखी नमूद केली असतील, किंवा

(iii) या नियमांमध्ये तरतूद केलेल्या पद्धतीनुसार कोणतीही चौकशी करणे राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट नाही अशी राज्यपालांची खात्री पटली असेल अशा बाबतीत शिस्तभंग विषयक प्राधिकरण प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन त्यासंबंधी त्यास योग्य वाटतील

ते आदेश देऊ शकेल."

११. अशा प्रकारे, अनुच्छेद ३११ (२) (ख) आणि आरपीएफ नियमांमधील नियम १६१ (ii) या दोन्हीनुसार, चौकशी करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नाही अशी खात्री झाल्याचे नोंदविल्यानंतर, सक्षम प्राधिकारी दलाच्या सदस्यावर शिक्षा लादू शकतो.अशा प्रकारे चौकशी निकाली काढण्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी दोन आवश्यक बाबी आहेत :
(i) चौकशी करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नाही अशी सक्षम प्राधिकाऱ्याची झालेली खात्री (ii) अशी खात्री होण्यासाठी नोंदविलेली कारणे.

१२. **केंद्र सरकार विरुद्ध तुलसीराम पटेल** (१९८५) ३ एससीसी ३९८ या प्रकरणातील न्यायनिर्णयामध्ये, घटनापीठाने चौकशीविना केलेल्या बडतर्फीच्या आदेशास आव्हान देणाऱ्या न्यायिक पुनर्विलोकनाच्या व्याप्तीबाबत कायद्याचे प्रतिपादन केले आहे. त्यातील परिच्छेद १३८ मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे :

> **१३८.** सेवा नियमातील खंड (ख) किंवा तत्सम तरतुदी लागू करून जेव्हा एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास बडतर्फ केले जाते, कामावरून काढून टाकले जाते किंवा पदावनत केले जाते आणि तो अनुच्छेद २२६ नुसार उच्च न्यायालयासमोर किंवा अनुच्छेद ३२ नुसार या न्यायालयासमोर येतो, तेव्हा

न्यायालय जिथे प्रशासकीय स्वेच्छानिर्णयाचा वापर केला आहे अशा प्रकरणातील न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी कायदेशीर दृष्ट्या सुस्थापित कारणांच्या आधारे हस्तक्षेप करेल.. सेवा नियमांतील खंड (ख) किंवा तत्सम तरतूद योग्य रीत्या लागू केली होती की नाही हे न्यायालय विचारात घेईल. **चौकशी करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नव्हते या शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्याच्या निर्णयास अनुच्छेद ३११ खंड (३) नुसार दिलेले अंतिम रूप न्यायालयावर बंधनकारक नाही. रिट याचिकांमध्ये अप्रमाणिकपणाचे आरोप केले असल्यास त्याची सुद्धा न्यायालय तपासणी करेल. कारणांची संबद्धता तपासताना चौकशी करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नव्हते या निष्कर्षास शिस्तभंग विषयक प्राधिकारी कोणत्या परिस्थितीमुळे आले याचा न्यायालय विचार करेल.जर न्यायालयास असे आढळून आले की सदर कारणे असंबद्ध होती तर शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने त्याची खात्री झाल्याचे नोंदविणे हे खंड (ख) नुसार त्यांना दिलेल्या अधिकारांचा गैरवापर ठरेल आणि न्यायालय सदर प्रकरण त्या खंडाच्या कक्षेबाहेर आणून शिक्षेचा आक्षेपित आदेश विधीअग्राह्य ठरवेल.** परंतु, शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्याने दिलेल्या कारणांची संबद्धता लक्षात घेतल्यानंतर,

न्यायालय प्रथम अपिलाच्या न्यायालयाप्रमाणे त्याचा निकाल द्यायला सुरुवात करणार नाही.कारणे खंड ( ख) अशी सुसंगत आहेत की नाहीत हे ठरविण्यासाठी न्यायालयाने शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्याच्या जागी स्वतःला मानले पाहिजे आणि तशा प्रचलित परिस्थितीत, एखादी समंजस व्यक्ती कशी समंजसपणे वागेल याचा विचार न्यायालयाने केला पाहिजे. चौकशी करणे आवश्यक आहे की नाही या प्रश्नावर जणू शिस्तभंग विषयक प्राधिकारी निर्णय घेत होता हे विचारात न घेता, न्यायदालनाच्या शांत आणि अलिप्त वातावरणात , प्रश्नाधीन परिस्थिति तेव्हाच्या प्रचलित परिस्थिती विचारात घेऊन प्रकरणांमध्ये न्याय दिला पाहिजे.जेव्हा दोन दृष्टिकोन शक्य असतील तेव्हा न्यायालय हस्तक्षेप करणार नाही.

( यावर भर देण्यात आला आहे.)

१३. सद्य प्रकरणामध्ये दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजीच्या बडतर्फीच्या आदेशाचे अवलोकन केले असता, असे निसंदिग्धपणे दिसून येते की, दलाच्या नोंदणी केलेल्या सदस्यांकरिता आरपीएफ नियमांमध्ये दिलेल्या पद्धतीनुसार सखोल चौकशी डी अँड ए आर चौकशी करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नाही अशी खात्री झाल्याचे संबंधित प्राधिकाऱ्याने नोंदविले आहे. ती खात्री होण्यासाठीची कारणे सुद्धा त्याने नोंदविली आहेत.अशा प्रकारे, अनुच्छेद ३११ (२) (ख)

आरपीएफ नियमांमधील नियम १६ (ii) यांमधील दोन्ही आवश्यक अटींची पूर्तता होते.

१४. **तुलसीराम पटेल** या प्रकरणात प्रतिपादन केलेल्या न्यायिक पुनर्विलोकनाच्या व्याप्तीची रूपरेषा लक्षात घेऊन, बडतर्फीच्या आदेशामध्ये नोंदविलेली कारणे समर्थनीय होती का हे आम्ही तपासण्याची कार्यवाही करतो. चौकशी न करण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्यांनी खालील कारणे नमूद केली आहेत :

१. निरीक्षक मुंबई सेंट्रल यांच्या दिनांक १०.०१.२०१९ रोजीच्या अहवालानुसार, दोन्ही बळी व्यक्तींना त्यांचे पैसे हवालदार सचिन कुमार यांच्याकडून परत मिळाल्यामुळे, त्यांनी हवालदार विरुद्ध एफआयआर नोंदविण्यास नकार दिला.त्यांनी सदर प्रकरणात आपापसांत तडजोड केली. त्यामुळे विभागीय चौकशी वाजवीरीत्या व्यवहार्य होणार नाही.

२. जबर शिक्षा लादण्यासाठी विभागीय चौकशी करण्यामध्ये दीर्घ काळ लागतो.त्यामुळे अशा प्रकरणात गुंतलेल्या व्यक्तीवर दहशती शिक्षा लादण्याचे कोणतेही प्रयोजन उरत नाही.शिस्तभंग विषयक प्राधिकारी आणि क्षेत्र कर्तव्यावर नेमणूक झालेला अधिकारी असल्यामुळे माझे असे मत आहे की, दलाच्या सदस्याच्या अशा लज्जास्पद, तिरस्करणीय

आणि भेकड कृत्यामुळे दलाच्या दुसऱ्या सदस्यांच्या मेहनतीने जे काही साध्य केलेले होते ते अपूर्ण राहिले.

३. योग्य शिस्तभंग विषयक चौकशी करण्याकरिता, साक्षीदारांना तपासणीसाठी बोलावणे आवश्यक आहे या प्रकरणात D & AR  चौकशी दरम्यान जे आरोपी किंवा भिन्न घटक त्यांच्यावर दबाव आणू शकतील किंवा त्यांना धमकावू  शकतील.४. डी ॲण्ड ए आर चौकशी दरम्यान बळी व्यक्ती सरकारी साक्षीदार म्हणून भीतीपोटी दलाच्या गणवेशधारी सदस्यांविरुद्ध त्यांचे जबाब देण्याची हिंमत करणार नाहीत. अशा बाबतीत दलाच्या सदस्यांनी साक्षीदारांवर दबाव आणल्याची अशी बरीच उदाहरणे आहेत.

५. प्रकरणाचे गांभीर्य आणि रेल्वे संरक्षण दलाच्या लौकिकावर  आणि भारतीय रेल्वेच्या प्रतिमेवर होणारा प्रतिकूल परिणाम लक्षात घेता या प्रकरणात चौकशी करणे योग्य ठरणार नाही.

६. उशिरा केलेल्या कारवाईची दलाच्या जबाबदार सदस्यांमध्ये चर्चा होईल आणि त्यामुळे दलाची शिस्त नष्ट होईल आणि त्याकडे दुर्लक्ष केल्यास,  संसर्गजन्य रोगाप्रमाणे ते पसरेल.

१५. निरीक्षक, मुंबई सेंट्रल यांनी सादर केलेला दिनांक १० जानेवारी, २०१९ रोजीचा अहवाल हा सक्षम प्राधिकाऱ्याने नोंदविलेल्या पहिल्या कारणाचा पाया आहे.उत्तरवादी यांनी निशाणी क्रमांक R १२ येथे असलेल्या त्याच्या उत्तरादाखल दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात सादर केलेला अहवाल आम्ही वाचला.त्या अहवालामध्ये दिनांक २० डिसेंबर २०१८ रोजीच्या एका जुन्या प्रसंगाचा उल्लेख केला आहे, ज्या घटनेमध्ये प्रवाशांना धमकावून त्यांच्याकडून पैसे उकळण्याच्या अशाच प्रकारच्या कृत्याबद्दल याचिकाकर्त्यास ताकीद देण्यात आली होती. प्रवाशांनी पैसे दिल्याची खात्री करण्यासाठी त्यांना संपर्क साधण्यासाठी केलेला प्रयत्न आणि सहकार्य करण्यासाठी किंवा याचिकाकर्त्या विरुद्ध तक्रार दाखल करण्यासाठी त्यांनी नंतर दर्शविलेली अनिच्छा या बाबींचा अहवालात उल्लेख केला आहे.प्रवाशांना पैसे परत दिल्याबाबत याचिकाकर्त्याची कबुली आणि एस आय पी एफ भरारलाल मीना याचा नोंदविलेला जवाब यांचाही अहवालात उल्लेख आहे.याचिकाकर्त्यासह विविध कर्मचारी आणि प्रवासी यांचे नोंदविलेले जबाब सुद्धा अहवालास जोडलेले आहेत.सीएसएमटी आणि कल्याण रेल्वे स्थानकांदरम्यान दिनांक १२ जानेवारी, २०१९ रोजी घडलेल्या दुसऱ्या एका घटनेचाही अहवालात उल्लेख आहे. सदर घटनेत याचिकाकर्त्यासह इतर जीआरपी सहकाऱ्यांनी प्रवाशांकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला होता आणि त्या घटनेचा तपास सुरू आहे.याचिकाकर्त्याचे वर्तन लक्षात घेता तो अशा प्रकारच्या कृत्यात भविष्यातही सहभागी होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि त्याच्या अशा बेकायदेशीर कृत्यांमुळे विभागाची प्रतिमा मलिन झाली हे निरीक्षक, आरपीएफ, मुंबई सेंट्रल यांचे मत अहवालाअंती नोंदविले आहे.

१६. जरी निरीक्षकाच्या अहवालामध्ये, याचिकाकर्त्याने प्रवाशांकडून पैसे उकळल्याच्या आरोपांच्या पूर्वीच्या आणि त्यानंतरच्या घटनांचा उल्लेख असला तरीही त्याच्या बडतर्फीचे ते कारण नसल्यामुळे आम्ही आमचे निष्कर्ष दिनांक १२ डिसेंबर, २०१८ रोजीच्या घटनेपुरते सीमित ठेवतो.निरीक्षकाच्या अहवालामध्ये प्रवाशांची दूरध्वनीवरून संभाषण केल्याचा संदिग्ध उल्लेख आहे. परंतु त्या प्रवाशांनी कोणत्याही कागदोपत्री पुराव्यात सहभागी होण्यास असमर्थता दर्शविली. निरीक्षकांच्या अहवालातील अशा संदिग्ध उल्लेखाच्या आधारे, चौकशी करणे वाजवीरीत्या व्यवहार्य ठरणार नाही असा निष्कर्ष काढण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पुरेसा पुरावा होता असे म्हणता येऊ शकत नाही. दुसऱ्या बाजूस, निरीक्षकाच्या अहवालास जोडलेल्या विविध जबाबांवरून असे दिसते की, दलाचे सदस्य असलेले इतर साक्षीदार तिथे उपलब्ध होते .असे दिसून येते की बंटी सिंग आर पी एफ/ सिटी/ बीसीटीआर, दीनदयाल, आर पी एफ/ सी टी/ बी सी टी ( एल), काशी प्रसाद, आर पी एफ/ सिटी/ बीसीटीआर, बनवारी लाल, आर एफ पी/ सिटी/ बी सी टी ( एल) आणि विजयकुमार, आर पी एफ/ एच टी सी/ बी सी टी ( एल) यांचे जबाब सुद्धा नोंदविण्यात आले होते.जर विभागीय चौकशी दरम्यान त्यांचे जबाब कायम राहिले असते तर याचिकाकर्त्यास दोषी मानण्याकरिता पुरेसा पुरावा तयार झाला असता अथवा नाही याबाबत या टप्प्यावर आम्ही कोणताही निष्कर्ष नोंदवू इच्छित नाही.या क्षणी हे समजणे पुरेसे आहे की, चौकशी दरम्यान तपासता येण्याजोगे इतर अनेक साक्षीदार तेथे उपस्थित होते. प्रवाशांना साक्षीदार म्हणून तपासण्यासाठी

निरीक्षकाने एक दूरध्वनी करण्या व्यतिरिक्त, प्रवाशांना संपर्क साधण्याचे इतर कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही, हे सुद्धा नमूद करणे प्रस्तुत आहे. हे सुद्धा नमूद करणे प्रस्तुत आहे की, दोषारोपाचे ज्ञापन दिल्यानंतर आणि प्रवाशांवर साक्षी समन्स बजावण्यात आल्यानंतरच, ते प्रवासी चौकशीमध्ये साक्ष देतील की नाही या मुद्द्यावर निर्णय घेण्याची वेळ आली असती.याचिकाकर्त्याने साक्षीदारांना धमकावले किंवा त्याच्याविरुद्ध साक्ष देण्यास घाबरवले असे उत्तरवादींचे म्हणणे नाही.दूरध्वनी संभाषणादरम्यान प्रवाशांनी याचिकाकर्त्याने त्यांना धमकी दिल्याचे किंवा भीतीपोटी त्यांनी साक्षीदार म्हणून साक्ष देण्यास नकार दिल्याचे त्यांनी उघड केल्याची बाब निरीक्षकाच्या अहवालात नोंदवण्यात आलेली नाही.कागदोपत्री कार्यवाहीत सहभागी न होण्याची बाब त्यांनी व्यक्त केली आहे.त्यामुळे चौकशीविना आक्षेपित आदेशामध्ये नोंदविलेले पहिले कारण आम्हाला टिकण्याजोगे असल्याचे आढळून येत नाही.

१७. जबर शिक्षा लादण्यासाठी विभागीय चौकशी करण्यासाठी कार्यवाही मध्ये लागणारा दीर्घ काळ हे दुसरे कारण आहे. हे कारण नाकारण्यायोग्यच आहे.जर असा तर्क मान्य केला तर विभागीय चौकशी करण्यासाठी दीर्घ काळ लागण्याची शक्यता असलेल्या प्रत्येक प्रकरणांमध्ये, चौकशी विना कार्यवाही करावी लागेल.म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने नोंदविलेले दुसरे कारण सरळसरळ फेटाळण्याजोगे आहे असे आमचे मत आहे.

१८. तिसरे कारण म्हणजे चौकशी दरम्यान साक्षीदारांना याचिकाकर्त्याद्वारे किंवा बाह्य घटकांकडून दबाव आणण्याची किंवा धमकावले जाण्याची शक्यता हे आहे. हे म्हणजे दुसरे काही नसून निव्वळ तर्क आहे. याचिकाकर्त्याने साक्षीदारांवर दबाव आणला किंवा त्यांना धमकावले असा निष्कर्ष काढण्यासाठी अभिलेखावर कोणतीही महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे तिसरे कारण देखील फेटाळण्यास पात्र आहे.

१९. चौथे कारण म्हणजे पीडितांनी भीतीपोटी याचिकाकर्त्याविरोधात जो, सदर दलाचा गणवेशद्वारी सदस्य आहे, त्याच्या विरुद्ध साक्ष देण्याचे धाडस दाखविले नसल्याची शक्यता आहे.हे पुन्हा तर्क वर्तवण्याच्या क्षेत्रात येते. या कारणाचा उल्लेख करून दलाच्या प्रत्येक गणवेशधारी सदस्याविरुद्धची चौकशी माफ केली जाऊ शकते, हे रेल्वे संरक्षण दल नियमांच्या अनुच्छेद ३११ (२) (ख) किंवा नियम १६१ ( ii ) च्या अंतर्गत हे अभिप्रेत नाही.चौकशी माफ करण्यासाठी प्रत्येक प्रकरणाची विशिष्ट कारणे नोंदवणे आवश्यक आहे, ज्याचा अवलंब प्रस्तुत प्रकरणात केल्याप्रमाणे सामान्य स्वरूपाचे निष्कर्ष नोंदवून करता येणार नाही.

२०. पाचवे आणि सहावे कारण हे चौकशी माफ करणे आणि रेल्वे संरक्षण दल आणि भारतीय रेल्वेच्या प्रतिष्ठेवर प्रतिकूल परिणाम तसेच दलाची शिस्त बिघडणे आहे. हे खरे आहे की, रेल्वे संरक्षण दल हा एक शिस्तबद्ध दल आहे आणि प्रत्येक नोंदणीकृत सदस्याने नेहमी शिस्तीचा आदर करणे आवश्यक

आहे.तथापि, केवळ शिस्तीचा भंग केल्यामुळे किंवा दलाची प्रतिष्ठा ही कथितरित्या मलिन झाली आहे, हे चौकशी माफ करण्यासाठी पुरेसे कारण असू शकत नाही. अनुच्छेद ३११ अंतर्गत प्रत्येक सरकारी कर्मचाऱ्याला विशेष संरक्षण दिले जाते, ज्याला विभागीय चौकशी केल्याशिवाय बडतर्फ करणे, पदावरून दूर करणे किंवा पदावनत करता येत नाही.अनुच्छेद ३११ (२) मधील खंड (क), (ख) आणि (ग) हे या संरक्षणास अपवाद आहेत.अशा अपवादात्मक अधिकाराचा वापर विशिष्ट पुराव्यानिशी सिद्ध न करता चौकशी माफ करण्यासाठी नियमितपणे केला जाऊ शकत नाही.

२१. अशाप्रकारे चौकशी माफ करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने नोंदवलेली सर्व कारणे ही न टिकण्याजोगी आहेत.आम्हाला न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधिकारावरील मर्यादेची जाणीव आहे आणि चौकशी माफ करण्यासाठी नोंदविलेल्या कारणांबाबत अपिलीय प्राधिकारी म्हणून बसण्याची आमची इच्छा नाही. तथापि, कोणतीही कारणे तर्कप्रबळ नाहीत आणि आमच्या दृष्टीने चौकशी ही अनुच्छेद ३११ (२) (ख) आणि रेल्वे संरक्षण दलाच्या नियम १६१ मधील विशेष अधिकाऱ्यांचा ढोबळपणे दुरुपयोग करून मनमानी पद्धतीने माफ करण्यात आली आहे.

२२. वर निरीक्षण केल्यानुसार, या टप्प्यावर याचिकाकर्त्याविरुद्ध साक्ष देण्याची प्रवाशाची इच्छा नसल्याचा अंदाज लावला जाऊ शकत नाही.प्रवाशाच्या चौकशीसाठी उपस्थित न राहण्याचा सर्वात वाईट परिस्थितीत जर

उत्तरवाद्यांकडे इतर साक्षीदार असतील तर त्यांची चौकशीमध्ये पडताळणी केली जाऊ शकते. अशा परिस्थितीत इतर साक्षीदारांचे साक्षीमूल्य काय असेल हे सक्षम प्राधिकाऱ्याने मूल्यमापन करून निश्चित केले पाहिजे. ऐकीव पुरावा हा विभागीय चौकशीसाठी पूर्णपणे विरोधात नाही. यासंदर्भात रतन सिंग (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर श्री शेट्टी यांची भिस्त असणे हे जरी त्यांच्या खटल्याला असमर्थनीय असले तरी, ते योग्यच आहे. त्या न्यायनिर्णयामध्ये खालील प्रमाणे निर्णय दिला की,

> ४. कार्यालयांतर्गत चौकशीत भारतीय पुरावा कायद्यांतर्गत पुराव्याचे सक्त आणि जटील नियम लागू होणार नाहीत हे निश्चित आहे. सुज्ञ मनासाठी तार्किकदृष्ट्या पुरावा असलेल्या सर्व बाबी अनुज्ञेय आहेत. **वाजवी संबंध आणि विश्वासार्हता असल्यास ऐकीव पुराव्यांबद्दल काही विरोध नाही.** हे खरे आहे की, विभागीय प्राधिकारी आणि प्रशासकीय न्यायाधीकरणांनी अशा माहितीचे मूल्यमापन करताना सावधगिरी बाळगली पाहिजे आणि भारतीय पुरावा कायद्यांतर्गत ज्याची वाच्यता सक्तपणे केली जात नाही त्याकडे सरळसरळ दुर्लक्ष नाही केले पाहिजे. जरी आम्हाला दोन्ही पक्षांकडील वकिलांनी निर्णयविधींचा संदर्भ दिला असला तरी, या विधानासाठी निर्णय किंवा पाठ्यपुस्तके उद्धृत करणे आवश्यक नाही.न्यायिक दृष्टिकोनाचा सार म्हणजे वस्तुनिष्ठता, बाह्य बाबी वगळणे आणि नैसर्गिक

न्यायाच्या नियमांचा विचार करणे व त्यांचे पालन करणे हे आहे. अर्थात, निष्पक्ष:पातीपणा हा आधार आहे आणि जर विकृतता किंवा मनमानीपणा, पक्ष:पातीपणा किंवा न्यायनिर्णयाच्या स्वातंत्र्याची शरणागती, या निष्कर्षापर्यंत पोहोचलेल्या निष्कर्षांना बाधा आणत असतील तरी, असे निष्कर्ष जरी ते स्थानिक न्यायधीकरणाने काढलेले असले तरी ते योग्य म्हणून गृहीत धरले जाऊ शकत नाहीत. तथापि, खालील न्यायालयांनी कदाचित असा आग्रह धरून स्वतःला चुकीचे निर्देश दिले की, जे प्रवासी आत आले आणि बाहेर गेले त्यांचा पाठलाग केला जावा आणि वैध निष्कर्ष नोंदवण्याआधी न्यायधिकरणासमोर आणले जावे. **उत्तरवादीच्या वकिलांनी उल्लेख केलेल्या 'रेसिड्युम नियम' जो अमेरिकन विधीतत्त्वमीमांसेच्या विशिष्ट परिच्छेदावर आधारित आहे, त्याचा अर्थ त्या मर्यादेपर्यंत लागत नाही किंवा हर्ल्सबरीच्या परिच्छेदात अशा साचेबंद आवश्यकतेचा आग्रह धरीत नाही.** साधा मुद्दा असा आहे की, काही पुरावे होते किंवा कोणतेही पुरावे नव्हते - नियमित न्यायालयीन कामकाज चालवणाऱ्या तांत्रिक नियमांच्या अर्थाने नव्हे तर, व्यवहारज्ञान किंवा संसारिक शहाणपण असणारे लोक स्वीकारतील अशा न्यायपद्धतीने.या दृष्टिकोनातून पाहता, स्थानिक न्यायाधिकरणाच्या निष्कर्षांच्या पुराव्यातील

पुरेशी पुराव्याची छाननी करण्यापलीकडे आहे.एखाद्या निष्कर्षाच्या कोणताही पुरावा उपलब्ध नसणे हे न्यायालयाकडे पाहण्यासाठी नक्कीच उपलब्ध आहे कारण, ती अभिलेखावर स्पष्ट कायद्याची त्रुटी आहे.आम्हाला या प्रकरणात असे आढळले की, भरारी पथकाचे निरीक्षक चमनलाल यांची साक्ष हे काही पुरावे आहेत, जे उत्तरवादीवर लावण्यात आलेल्या आरोपाशी संबंधित आहे. **त्यामुळे, आम्ही त्या आधारावर हे गृहीत धरू शकत नाही की, आदेश हा विधिअग्राहय आहे.**

( यावर भर देण्यात आला)

२३. तथापि, सध्याच्या प्रकरणात एखाद्या पुराव्याच्या पर्याप्ततेसाठी निष्कर्षाची नोंद करणे, हे खूप कालपूर्व ठरेल कारण, साक्षी पुरावा नोंदवणे हे अद्याप बाकी आहे. या टप्प्यावर हे सांगणे पुरेसे आहे की, विभागीय चौकशी करणे शक्य आहे आणि ती करणे अव्यवहार्य आहे असा निष्कर्ष काढणे न टिकण्याजोगे आहे.

२४. सध्याच्या प्रकरणात आम्ही जो दृष्टिकोन ठेवण्याचा प्रस्ताव ठेवतो त्याला श्री. वालिया यांनी भिस्त ठेवलेल्या विविध निकालांचे पूर्ण समर्थन आहे ज्यामध्ये, पोलीस, केंद्रीय रेल्वे संरक्षण दल किंवा रेल्वे संरक्षण दल यांसारख्या शिस्तबद्ध दलांच्या सदस्यांविरुद्ध चौकशी माफ करण्याचा निर्णय सर्वोच्च

न्यायालयाने मंजूर केलेला नाही.**रिसाल सिघ** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये अपीलकर्ता, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हा एका दुरचित्रवाणी वाहिनीने केलेल्या स्टिंग ऑपरेशन मध्ये भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये गोवलेला होता आणि त्यास कोणतीही चौकशी न करता सेवेतून बडतर्फ करण्यात आले.चौकशी माफ करण्याचे एक मुख्य कारण म्हणजे लोकांच्या नजरेत पोलीस दलाच्या प्रतिमेस बट्टा लावणे होय. सर्वोच्च न्यायालयाने, विविध निर्णयांचा विचार केल्यानंतर परिच्छेद क्रमांक ९ मध्ये खालीलप्रमाणे निर्णय दिला.

> "९. उपरोक्त प्राधिकाऱ्यांच्या कसोटीची चाचणी केली असता, अनिवार्य निष्कर्ष असा आहे की, पोलीस अधीक्षकांनी चौकशी माफ करण्यासाठी पारित केलेला आदेश हा पूर्णपणे न टिकण्याजोगा आहे आणि तो रद्दबातल करण्यात आला आहे. संस्थेचा संस्थापक या नात्याने, उच्च न्यायालयाच्या आदेशावर योग्य दृष्टिकोनातून सुनावणी न घेता, अंतिम आदेशाला मान्यता देण्याचा आदेश पारित करणे हे देखील असमर्थनीय आहे आणि परिणामी शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी दिलेला बडतर्फीचा आदेश रद्द होण्याचा मार्ग सुगम झाला आहे."

२५. **जसवंत सिंग** (उपरोल्लेखित) हे देखील पोलीस दलातील शिपायाला शिरजोरपणा दाखविण्याच्या आणि वरिष्ठांविरुद्ध पोलीस सहकाऱ्यांमध्ये असंतोष, द्वेष पसरविल्याच्या आरोपाखाली बडतर्फ करण्यात सामील होते.

बडतर्फीच्या आदेशामध्ये असा निष्कर्ष नोंदविण्यात आला की, अपीलकर्त्याने साक्षीदारांना आणि चौकशी अधिकाऱ्याला शारीरिक इजा पोहोचवण्याची धमकी दिली होती.अपील मंजूर करताना, माननीय सर्वोच्च न्यायालयाने न्यायनिर्णयाच्या परिच्छेद क्रमांक ५ मध्ये खालील प्रमाणे निर्णय दिला की -

> "..... हे केवळ आक्षेपित आदेशाच्या परिच्छेद ३ चे पुनरावृत्तीपेक्षा जास्त नाही. परिच्छेद ३ मधील आरोपांच्या समर्थनार्थ आक्षेपित आदेशाच्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या कोणत्याही माहितीकडे आमचे लक्ष वेधले गेले नाही की, अपीलकर्त्याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी त्याच्या विरोधात कोणतीही विभागीय चौकशी करण्यास परवानगी देणार नाहीत आणि असा कोणताही प्रयत्न केल्यास ते साक्षीदार आणि चौकशी अधिकाऱ्याला शारीरिक इजा पोहोचविण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.उत्तरवादी क्रमांक ३ ने आक्षेपित आदेशात नोंदवलेल्या व्यक्तीनिष्ठ समाधानाच्या समर्थनार्थ आक्षेपित आदेश पारित करण्याच्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या बाबींची माहिती न्यायालयासमोर उघड करणे हे उत्तरवादींवर बंधनकारक होते. अनुच्छेद ३११ (२) च्या दुसऱ्या परंतुकाचा खंड (ख ) चा वापर तेव्हा केला जाऊ शकतो, जेव्हा प्राधिकारी त्याच्यासमोर ठेवलेल्या माहितीवरून समाधानी असेल की,

विभागीय चौकशी करणे रास्तपणे व्यवहार्य  नाही.तुलसीराम प्रकरणाच्या पृष्ठ २७० वरील पुढील निरीक्षणातून हे स्पष्ट आहेः (एससीसी पृ. ५०४, परिच्छेद १३०)

'शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने बेफिकीरीने किंवा मनमानीपणाने किंवा केवळ चुकीच्या हेतूने किंवा केवळ चौकशी सुरू करणे टाळण्यासाठी किंवा सरकारी कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध विभागाचा खटला हा कमकुवत आहे आणि तो अयशस्वी झालाच पाहिजे, या कारणासाठी शिस्तभंगविषयक चौकशी माफ करणे अपेक्षित नाही."असा टोला लगावला.

'त्यामुळे विभागीय चौकशी माफ करण्याचा निर्णय हा केवळ संबंधित प्राधिकाऱ्याने केलेल्या साध्या विधानावर विसंबून राहू शकत नाही.  जेव्हा संबंधित प्राधिकाऱ्याच्या समाधानाबाबत कायद्याच्या न्यायालयात प्रश्न उपस्थित केला जातो तेव्हा, हे समाधान काही विशिष्ट वस्तुनिष्ठ तथ्यांवर आधारित आहे आणि संबंधित प्राधिकाऱ्याच्या लहरीपणाचा किंवा मर्जीचा परिणाम नाही हे दाखवणे आदेशाचे समर्थन करणाऱ्यांवर बंधनकारक आहे.उत्तरवादी क्रमांक ३ ने दाखल केलेल्या प्रतिदाव्यामध्ये असा दावा करण्यात आला आहे की, अपीलकर्त्याने कारणे दाखवा नोटीशीवर विसंबून राहण्याऐवजी त्याच्या सहकारी पोलीस

अधिकाऱ्यांना वरिष्ठांची अवज्ञा करण्यास प्रवृत्त केले. तसेच त्याच्याविरुद्ध विभागीय चौकशी केल्यास साक्षीदार आणि चौकशी अधिकाऱ्यांना मारहाण करू अशा धमक्याही त्यांनी दिल्याचे दावा केला जातो.याचा तपशील दिलेला नाही.याशिवाय तो रुग्णालयात असताना त्याने धमक्या इत्यादी कशा दिल्या असतील, हे समजणे कठीण आहे.तसेच आक्षेपित आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये आरोप केल्याप्रमाणे अपीलकर्त्याने धमक्या दिल्या या निष्कर्षावर उत्तरवादी क्रमांक ३ कोणत्या माहितीच्या आधारे आले, हे दर्शविलेले नाही.आक्षेपित आदेशाची बारकाईने छाननी केल्यावर असे दिसते की, तो त्याच्या सहकाऱ्यांना भडकावत होता आणि त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल असंतोष बाळगत होता, या आधारावर समाधान आधारित होते.हा आरोप पोलीस ठाणे अंमलदार/ सरकारी रेल्वे पोलीस, जुलुन्धर, यांनी २ एप्रिल १९८१ रोजी त्याच्या जुलुन्धर येथील अभिकथित कारवायांबाबत दिलेल्या अहवालावर आधारित आहे.तो अहवाल अभिलेखावर आलेला नाही. सदर पोलीस ठाणे अमलदार यांना धमकवण्यात आले, असे कोणाचेही म्हणणे नाही.उत्तरवादी क्रमांक ३ ने दाखल केलेला प्रतिदावा देखील त्याने माहितीच्या अचूकतेची पडताळणी केली आहे की नाही, हे उघड करत नाही. अगदी संक्षिप्तपणे सांगायचे झाल्यास,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३११ (२) मध्ये विचारात घेतल्यानुसार आक्षेपित आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये नोंदवलेले व्यक्तिनिष्ठ समाधान चौकशी माफ करण्याचे समर्थन करण्यासाठी कोणत्याही स्वतंत्र माहितीद्वारे बळकटी आणत नाही.त्यामुळे केवळ या संक्षिप्त आधारावर आक्षेपित आदेश टिकवण्याजोगा नाही असे आमचे मत आहे."

२६. **राम बहादुर यादव** (उपरोलेखित) या प्रकरणामधील उत्तरवादी हा रेल्वे संरक्षण दल मध्ये हवालदार म्हणून कार्यरत होता आणि त्याच्यावर रुपये १,००,००,०००/- किमतीच्या गैरन्यायिक मुद्रांक बनावट प्रकरणामध्ये आरोपी म्हणून आरोप ठेवण्यात आले होते.चौकशी करणे हे व्यवहार्य नसल्याचे सांगत त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले.सर्वोच्च न्यायालयाने रेल्वे संरक्षण दलाच्या नियमांच्या नियम क्र. १६१ चा संदर्भ दिला आणि परिच्छेद क्रमांक १४ ते १७ मध्ये खालील प्रमाणे म्हटले आहे;

"१४. ही एक सर्वमान्य कायदेशीर स्थिती आहे की, जेव्हा नियम विशेष कार्यपद्धतीचा अवलंब करण्यासाठी पद्धती आणि रिती योजतात तेव्हा अधिकाऱ्यांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करून अशा अधिकाराचा वापर करणे अनिवार्य आहे.दलाच्या नियमित सदस्याला बडतर्फ करणे, ही एक अतिकठोर कारवाई आहे.नियम क्रमांक १६१ जो चौकशी माफ करणे आणि दलाच्या सदस्याविरुद्ध आदेश

पारित करणे विहित करतो तो अनिवार्य आणि वैध कारणे असल्याशिवाय, नियमित आणि यांत्रिक पद्धतीने लागू केला जाऊ शकत नाही. दिनांक २२/१०/१९९८ च्या बडतर्फीच्या आदेशामध्ये, गैरन्यायिक मुद्रांकाच्या चोरीसाठी उत्तरवादीने इतर हवालदारांची संगनमत केल्याचे नमूद करण्याव्यतिरिक्त चौकशी माफ करण्याचे कोणतेही कारण नमूद केले नाही. केवळ बडतर्फीच्या आदेशात नियमाच्या भाषेची पुनरुक्ती करून चौकशी माफ करण्यासाठी वैध आणि पुरेशी कारणे नोंदविल्याशिवाय हा आदेश वैध ठरणार नाही.जेव्हा नियमांमध्ये कारणे नोंदवणे अनिवार्य असते तेव्हा, त्याच आदेशामध्ये चौकशी माफ करण्यासाठी कारणे देखील उघड केली पाहिजे.१५. अपीलकर्त्यांसाठीच्या विद्वान जेष्ठ वकील यांचा युक्तिवाद असा आहे की, जर नस्तीमध्ये कारणे नमूद केली असतील आणि ती आदेश कायम करण्यासाठी पुरेशी असतील तर ती फेटाळण्यास पात्र आहेत. जेव्हा चौकशी केली जात नाही तेव्हा शिस्तभंगाचा उपाय म्हणून कोणताही आदेश पारित होण्यापूर्वी दलाच्या सदस्यास चौकशी माफ करण्याची कारणे जाणून घेण्याचा अधिकार आहे.

१६. संबंधित वेळी उत्तरवादी हा फक्त हवालदार या पदावर होता आणि तो अधिकाराच्या पदावर नव्हता, असे

म्हणण्यासाठी की, त्याने साक्षीदारांवर दबाव आणला असता किंवा त्यांना धमकावले असते तर चौकशी करण्यात आली असती का. त्यांनी गोपनीय चौकशी केली आहे हीच वस्तूस्थिती अप्पीलकर्त्याँची भूमिका खोटी ठरवते की, चौकशी करणे वाजवीरित्या व्यवहार्य नव्हते. नियमात वापरलेल्या 'वाजवीरित्या व्यवहार्य नाही' या शब्दांना अशा प्रकारे समजून घेतले पाहिजे की, एखाद्या विशिष्ट परिस्थितीत सामान्य आणि समंजस माणसाने असा निष्कर्ष काढला पाहिजे की, अशा परिस्थितीत हे व्यवहार्य नाही.सद्य प्रकरणामध्ये चौकशी माफ करण्याचे आणि नियमांमधील नियम क्रमांक १६१ लागू करण्याचे कोणतेही वैध कारण दिसत नाही. उच्च न्यायालयाने घेतलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत. **सहदेव सिंग आणि इतर विरुद्ध भारतीय संघराज्य आणि इतर १** या प्रकरणामध्ये या न्यायालयाने असे मानले आहे की, सदरच्या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीत निःपक्षपातीपणे चौकशी करणे वाजवीरित्या व्यवहार्य नव्हते, कारण ते प्रकरणाच्या वस्तुस्थितीनुसार न्याय्य आहे असे मानले गेले. चौकशी करणे व्यवहार्य आहे की नाही हे प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती आणि आरोपाचे स्वरूप इत्यादींच्या संदर्भात विचारात घ्यावयाची बाब आहे.

१७. **तरसेम सिंग विरुद्ध पंजाब राज्य आणि इतर २**

या प्रकरणातील न्यायनिर्णयात या न्यायालयाने स्पष्टपणे असे म्हटले आहे की, जेव्हा प्राधिकरणाचे असे मत आहे की, चौकशी करणे वाजवीरित्या व्यवहार्य नाही तेव्हा, अशा निष्कर्षांची नोंद प्राधिकाऱ्याने व्यक्तिनिष्ठ समाधानाच्या आधारे करावी आणि ती वस्तुनिष्ठ निकषांवर आधारित असावी. उपरोक्त प्रकरणात पुढे असे मानण्यात आले की, चौकशी माफ करण्यामागील कारणांना माहितीचे समर्थन असले पाहिजे."

२७. श्री. वालिया यांनी भिस्त ठेवलेल्या **जय भगवान** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील न्यायनिर्णयाची याचिकाकर्ते यांच्या म्हणण्याला कोणतीही मदत होणार नाही कारण, सदर प्रकरणातील बडतर्फीचा आदेश विभागीय चौकशी केल्यानंतर पारित करण्यात आला होता.

२८. श्री. शेट्टी यांनी भिस्त ठेवलेल्या **केंद्रीय विद्यालय संघटन** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील न्यायनिर्णयामुळे उत्तरवाद्यांच्या म्हणण्याला मदत झालेली नसून खरंतर ते त्यांच्या म्हणण्याच्या विरुद्ध आहे. त्या सदर प्रकरणात, त्यातील उत्तरवादी यांस अनुपस्थितीच्या आरोपांबाबत चौकशी न करता बडतर्फ करण्यात आले होते.केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरण यांनी बडतर्फीचा आदेश रद्दबातल केला आणि माननीय उच्च न्यायालय यांनी सदर आदेश कायम केला. माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी माननीय उच्च

न्यायालयाने नोंदविलेल्या मताशी सहमती दर्शवली.. माननीय सर्वोच्च न्यायालयाने, त्या प्रकरणातील उत्तरवादी निलंबन कालावधीतील पूर्ण वेतन मिळण्यास पात्र नाहीत असा निर्णय दिला व त्यांच्यावर ते प्राप्तीकारी कर्मचारी नव्हते हे सिद्ध करण्याची जबाबदारी सोपवली. माननीय सर्वोच्च न्यायालयाने नियोक्त्यांना विभागीय चौकशी सुरू करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले.या प्रकरणात आम्ही त्याच प्रकारचे स्वातंत्र्य प्रतिवादींना बहाल करीत आहोत.

२९. प्रकरणाचा सारांश विचारात घेतल्यानंतर, सक्षम प्राधिकारी यांनी चौकशी न करण्यात चूक केली आहे असे आमचे मत आहे. त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद ३११ (२) (ख) आणि रेल्वे सुरक्षा दल नियमांच्या नियम १६१ ( ii ) मधील तरतुदिंनुसार बडतर्फीचा आदेश कायम राहू शकत नाही. त्याचवेळी याचिकाकर्त्याला सहीसलामत सोडण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही आणि उत्तरवादिंना त्याच्याविरुद्ध आरोप असलेल्या गैरवर्तुणकीसंदर्भात विभागीय चौकशी करण्याचे स्वातंत्र्य असेल. यापूर्वी अशाच घटनांमध्ये याचिकाकर्त्याचा सहभाग असल्याचे आरोप आहेत आणि हिच बाब त्याच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करतांनाही विचारात घेतली जाऊ शकते.त्याच्याविरुद्ध लावण्यात आलेल्या आरोपांचे स्वरूप आणि नैसर्गिक न्यायतत्त्वांचे उल्लंघन केल्याच्या तांत्रिक कारणास्तव बडतर्फीचा आदेश रद्द केल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, याचिकाकर्ते मधल्या काळातील जे निलंबन मानले गेले आहे, त्या काळातील वेतन मिळण्यासाठी हक्कदार नाहीत. तो त्या काळातील निर्वाहभत्ता मिळण्यासाठी हक्कदार असेल. विभागीय चौकशीच्या

निकालावर अवलंबून, उत्तरवादी, सदर मधला कालावधी कर्तव्याचा कालावधी किंवा अन्यथा, मानतील.

३०. त्यानुसार आम्ही पुढील प्रमाणे आदेश देत आहोत:

१. वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त, रेल्वे सुरक्षा दल, मुंबई सेंट्रल यांनी १५ जानेवारी, २०१९ रोजी याचिकाकर्त्यांना सेवेतून बडतर्फ करणारा आदेश तसेच अपीलीय प्राधिकरणाने १९ जानेवारी, २०१९ रोजी दिलेला आदेश रद्दबातल ठरवण्यात आला आहे.

२. उत्तरवादी यांना याचिकाकर्ते यांस सेवेत पुनर्स्थापित करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

३. तथाकथित गैरवर्तनासाठी याचिकाकर्त्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यासाठी उत्तरवादींना स्वातंत्र्य आहे.

४. बडतर्फ केल्याच्या दिनांकापासून ते पुनर्स्थापना करण्यापर्यंतचा मधील कालावधी निलंबन समजले जाईल आणि याचिकाकर्ते नियमानुसार निर्वाहभत्ता मिळण्यास पात्र असतील.

५. विभागीय चौकशीच्या निकालावर अवलंबून उत्तरवादी मधील कालावधीस कर्तव्याचा कालावधी किंवा अन्यथा, मानण्याबाबत निर्णय घेतील.

६. त्यानुसार रिट याचिका मंजूर करण्यात येत आहे. विधीनिर्णय वर नमूद अटींमध्ये मंजूर करण्यात येत आहे. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

**संदीप व्ही मारणे, न्या.** **एस व्ही गंगापूरवाला, प्रभारी मुख्य न्यायमूर्ती**

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x